महाराष्ट्र शासन

क्रमांक: व्हीएलएस २००४/(४२१/२००४)/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १४ जून, २००४.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई /औरंगाबाद / लातूर /अमरावती .

**विषय : सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त (मराठी व इतर माध्यमाच्या) खाजगी प्राथमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

नविन प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील १३२ (एकशे बत्तीस ) शैक्षणिक संस्थांना सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात संस्थांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त (मराठी,हिंदी व उर्दू ) इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास " जून २००४" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे. परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेकडून रु.२०/- एवढया रकमेच्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही, असे हमी पत्र संस्थेकडून प्रथम लिहून घ्यावे. सदरहू हमीपत्र आपल्या कार्यालयातील संबंधीत नस्तीवर कायम स्वरुपी जतन करुन ठेवावे व त्याच्या प्रती प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात. त्याची प्रत शासनासही माहितीस्तव सादर करावी.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र क्र.व्हीएलएस १०००/(५५७/२०००)(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

(सु.हे. उमराणीकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हापरिषद, ठाणे / औरंगाबाद / लातूर / अमरावती / उस्मानाबाद / हिंगोली / नांदेड.
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती, प्राशि-३

C:\ARUN\2004-2005 PROPOSALS ISSUE ORDER-22.07.2004Marathi 421-04. 24.6.04-forwarding

**शासन पत्र क्रमांक खिप्रस-२००५/(४२१/२००४)/प्राशि-३, दिनांक २४ जून, २००५ अन्वये कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त प्राथमिक शाळांची यादी.**

**जिल्हा - औरंगाबाद.**

| अ.क्र. | संस्थेचे संपूर्ण नांव व संपूर्ण पत्ता | प्रस्तावित शाळेचे नांव व संपूर्ण पत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| १ | सोनाई शिक्षण प्रसारक मंडळ, पिंपरखेडा, ता.कन्नड | पिशोर | मराठी |
| २ | सिल्लोड शि-स-एन-११, सिडको, औरंगाबाद | घाट नांद्रा, ता.सिल्लोड | मराठी |
| ३ | सुदर्शन बहुउद्देशिय शिक्षण संस्था, बिडकीन, ता.पैठण. | बिडकीन, ता.पैठण. | मराठी |
| ४ | सजन शैक्षणिक प्रतिष्ठान बिडकीन ता.पैठण. | बिडकीन, ता.पैठण. | मराठी |
| ५ | तिरुपती बालाजी शिक्षण संस्था, बीड, बायपास दत्त मंदिराच्या मागे औरंगाबाद | बिड बायपास दत्त मंदिराच्या मागे औरंगाबाद. | मराठी |
| ६ | समर्थ प्रतिष्ठान शिवाजी नगर, सिडको, औरंगाबाद | शिवाजी नगर, सिडको, औरंगाबाद. | मराठी |
| ७ | लोकहितवादी राजर्षी शाहू महाराज शिक्षण प्रसारक मंडळ भिमनगर भावसिंगपुरा, औरंगाबाद | शिवपुरी कॉलनी, भुजबळ नगर, न्यु नंदनवन कॉलनी, औरंगाबाद. | मराठी |
| ८ | सायली चॅरिटेबल ट्रस्ट, औरंगाबाद | पळेगाव | मराठी |
| ९ | ब्रिलीयंटस् किन्डस स्कूल विष्णू नगर, औरंगाबाद. | विष्णू नगर, औरंगाबाद. | मराठी |
| १० | पूर्णयोगी जनार्दन स्वामी बहु.शिक्षण संस्था, सिडको एन-४, औरंगाबाद. | सिडको एन-४, औरंगाबाद | मराठी |
| ११ | कुमार स्वामी शिक्षण संस्था आदर्श कॉलनी हिंदु राष्ट्र चौक, औरंगाबाद | हिंदु राष्ट्र चौक, औरंगाबाद. | मराठी |
| १२ | शिवशक्ती जनसेवा मंडळ, धावणी मोहल्ला, औरंगाबाद | गल्ली नं.३, भानुदास नगर, गारखेडा, औरंगाबाद. | मराठी |